**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ०६/२०१७.</u>**

**नि. ६३ क्रमशः**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ शिवाजी मुरलिधर पगार यांचा पुढील सरतपास ॲड. डी.एस. वाघ यांच्यामार्फत शपथेवर सुरू :-</u>**

१. मी सदरील प्रकरणात पुराव्याकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **<u>नि.क्र. ६३</u>** वर आहे. सदरील प्रकरणात मी मौजे मेसनखेडे येथील गट <u>क्र.२५५/४</u>, <u>२५५/२</u>, <u>२५५/१</u>, <u>२५५/३</u>, <u>२५५/६</u>, <u>२५५/७</u>, <u>२५५/५</u> चे <u>७/१२</u> उतारे दाखल केले असून ते अनुक्रमे नि.क्र. ६९ ते ७५ वर आहेत.

**<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे वकिल श्री. एस.डी. थोरात यांच्यामार्फत सुरू:-</u>**

२. मी ४थी नापास आहे. मला माझी जन्म तारीख आठवत नाही. एकनाथ पुंजा पगार हे माझे आजोबा होते. ते कधी मयत झाले हे मला आठवत नाही. माझे आजोबा एकनाथ वारले त्यावेळी मी अंदाजे १६ वर्षांचा होतो. माझे आजोबा एकनाथ यांना मुरलिधर व नारायण अशी दोन मुले होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा एकनाथ यांना तीन मुली होत्या. त्यांची नावे हौशाबाई रखमाजी कुळधर, रखमाबाई नामदेव पवार व रेशमबाई येशीनाथ पवार अशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, हौशाबाई रखमाजी कुळधर, रखमाबाई नामदेव पवार व रेशमबाई येशीनाथ पवार या माझ्या आत्या आहेत व माझे त्यांच्या घरी जाणे-येणे असते. माझे वडील मुरलिधर कोणत्या सालात वारले हे मला सांगता येणार नाही. माझे वडील वारले त्यावेळी मी अंदाजे ६२ वर्षांचा होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे काका नारायण पगार हे सन २००८ मध्ये वारले. माझे वडिल मुरलिधर यांना शिवाजी, अंबादास व संजय अशी तीन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील मुरलिधर हे माझे काका नारायणचे मोठे भाउ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मुरलिधर व नारायण हे सन १९७५ च्या पुर्वीपासून वेगवेगळे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती हया मुरलिधर व नारायण यांच्या वडिलोपार्जीत मिळकती असून सन १९७५

पुर्वी दावा मिळकतींचा सर्वे क्रमांक ६७ होता. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. ६७ चे नंतर दोन पोट हिस्से होवून त्याचा क्रमांक ६७/१ व ६७/२ असा झाला. हे मला सांगता येणार नाही की, सर्वे क्र.६७/१ पश्चिमेला असून ६७/२ हा पुर्व बाजुने आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. ६७/१ व ६७/२ हे उत्तर-दक्षिण बांधाने विभागलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. ६७/२ हा लक्ष्मण पुंजा पगार यांच्या हिश्यास गेला होता.

३. माझे वडिल मुरलिधर व काका नारायण यांच्या हिश्यास कोणता सर्वे क्रमांक गेला हे मला सांगता येणार नाही. माझ्या हिश्यास आलेल्या गटाचा सर्वे क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुरलिधर व नारायण यांच्या हिश्यास आलेला सर्वे क्रमांक हा त्यांच्या वडिलोपार्जीत मिळकती होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिळकती त्यांनी आपआपसात वाटून घेतल्या. हे म्हणणे खरे आहे की, मुरलिधर व नारायण यांनी त्यांच्या हिश्यास आलेला सर्वे क्रमांक आपआपसात तोंडी वाटप करून घेतल्या व ते दोघेही त्यांच्या हिश्यास आलेली मिळकत स्वतंत्रपणे वहिती करू लागले. हे म्हणणे खरे आहे की, तोंडी वाटपाच्यावेळी मुरलिधर व नारायण यांनी त्यांना आलेल्या हिश्याची मोजणी करून घ ेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मुरलिधर व नारायण यांना तोंडी वाटपाद्वारे मिळालेल्या हिश्याचे कागदोपत्री वाटप हे सन १९९६ सालात तहसिलदार, चांदवड यांच्याकडे कलम ८५ नुसार करण्यात आले व त्यानुसार फेरफार नोंद क्र. ५२३ नोंदविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ सालात तहसिलदार यांच्याकडे झालेले वाटप हे मी, प्रतिवादी क्र. १ ते ४ व मयत विश्वनाथ अशा सहा लोकांमध्ये झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे सन १९९६ सालातील वाटप हे मुरलिधर पगार व इतर यांनी मी, प्रतिवादी क्र. १ ते ४ व मयत विश्वनाथ अशा सहा लोकांच्या लाभात करून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ सालातील वाटपाच्यावेळी मुरलिधर व नारायण हे दोघेही हयात होते. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९६ सालात वाटप झाल्यानंतर देखील मुरलिधर व नारायण हे त्यांच्या हिश्याच्या जमिनी स्वत: स्वतंत्ररित्या वहिती करत होते. हे म्हणणे खरे आहे की, मुरलिधर व

नारायण यांच्यात तोंडी वाटप झाल्यानंतर त्यांच्या हयातीत त्या दोघांमध्ये मिळकतीच्या बांधावरून तसेच क्षेत्रावरून कधीही कोणतेही वाद झाले नाहीत.

४. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा दाखल करेपर्यंत आम्ही दावा मिळकतींची अतिक्रमण झाले आहे अथवा नाही याबाबतची मोजणी केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ पासून सदरचा दावा दाखल करेपर्यंत प्रतिवादींनी मला माझ्या हिश्याची शेतजमीन वहिती करण्याकरीता कधीही हरकत, अडथळा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरच्या माझ्या मुळ दाव्यात प्रतिवादींनी माझ्या क्षेत्रात किती अतिक्रमण केले आहे याचा कुठेही उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुळ दावा दाखल केल्यानंतर मी न्यायालयीन आदेशाद्वारे दावा मिळकतींची मोजणी करून घेतली. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयीन आदेशाद्वारे मोजणी झाल्यानंतर मोजणी नकाशात कोणी कोणत्या गटात, कोणत्या बाजुने किती अतिक्रमण केले आहे हे दर्शविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोजणी नकाशाचा गैरफायदा घेवून मी मुळ दाव्यात दुरूस्ती केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुळ दाव्यातील परिच्छेद क्र. ३ मधील मजकुर '' वादी व प्रतिवादी यांचे दावा मिळकतीचा मुळ गट क्र. २५५ या संबंधाने सन १९९६ मध्ये झालेल्या वाटपाप्रमाणे दावा मिळकतीत ज्याचे-त्याचे वाटणी हिश्याचे शेतजमीनीचे क्षेत्राचे बांध हे वाटपाच्यावेळीच झालेले आहे. '', हा मजकुर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाटपाच्यावेळी झालेले बांध हे आज देखील जशासतसे आहे.

**न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

**वा.दा.ब.अ.क.के** **श्रवणोत्तर स्विकृती**

sd/-

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदवड** **(पी.बी. जोशी)**

**दि. ३०/१०/२०२३** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदवड.**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री. एस. डी. थोरात वकिल यांच्या मार्फत शपथेवर पुढे सुरु –**

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ च्या वाटपामध्ये गट क्र. २५५/१ क्षेत्र ६५ आर. व पोटखराबा १४ आर, २५५/३ क्षेत्र ०.२५ आर प्रतिवादी क्र. २ नंदलाल नारायण पगार याच्या वाटेला गेलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हापासुन वरील क्षेत्रच प्रतिवादी क्र. २ च्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २५५/२ चे ०१ हेक्टर क्षेत्र प्रतिवादी क्र. १ अंबादासच्च्या हिश्श्याला गेले आहे व वाटपापासुन अंबादासच्याच ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. २५५/४ क्षेत्र १ हेक्टर १४ आर माझ्या हिश्श्याला देण्यात आलेले आहे व माझ्याच ताब्यात आहे. मला गट क्र. २५५/४ पैकी ०१ हेक्टर क्षेत्र मिळाले आहे. गट क्र. २५५/४ मध्ये १४ आर पोटखराबा क्षेत्र होते. मला ०१ हेक्टर १४ आर क्षेत्र चांगली जमीन मिळाली आहे व १४ आर पोटखराबा क्षेत्र वाटपाने मिळाली आहे. साक्षीदार सांगतो की, सदर जमीनीपैकी १८ गुंठे क्षेत्र मला ताब्यात मिळाली नाही. आज रोजी माझ्या ताब्यात ०१ हेक्टर १२ गुंठे क्षेत्र असेल. वरील ०१ हेक्टर १२ गुंठे क्षेत्राची मी कच्ची मोजणी केली आहे. सदर मोजणी कोणाकडून केली त्याचे नांव मला सांगता येणार नाही. मी सदर मोजणी दाव्यातील न्यायालयीन आयुक्ताच्या मोजणीच्या ०६ महिन्यांपुर्वी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २५५/५ क्षेत्र ०१ हेक्टर ०९ आर विश्वनाथ नारायण पगार यांच्या वाटणीला गेले आहे व त्याचाच ताब्यात होते व त्याच्या मृत्युनंतर त्याच्या वारसांच्या ताब्यात व वहीवाटीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २५५/६ क्षेत्र ०१ हेक्टर ०६ आर प्रतिवादी क्र. ३ वसंत नारायण पगार यांच्या वाटणीला गेले आहे व त्याचाच ताब्यात व वहीवाटीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २५५/७ क्षेत्र ०१ हेक्टर ०६ आर प्रतिवादी क्र. ४ संजय मुरलीधर पगार यांच्या वाटणीला गेले आहे व त्याचाच ताब्यात व वहीवाटीत आहे.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, आमचा मुळ गट क्र. २५५ होता. गट क्र. २५५ चे एकूण क्षेत्रफळ किती होते हे मला सांगता येणार नाही. गट क्र. २५५ चे एकूण ०७ पोट हिस्से झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २५५ च्या उत्तर बाजूने चांदवड ते मनमाड रस्ता गेला आहे. आमचा गट चांदवड–मनमाड रस्त्याला काही अंतर सोडून सुरु होतो. आमच्या गट ते चांदवड–मनमाड रस्त्यादरम्यान २००० फुट अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचा गट उत्तर–दक्षीण आहे व काही भाग पुर्वेकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २५५ च्या पूर्व बाजूने उत्तर–दक्षिण असा रस्ता जातो व तो गट क्र. २५५/२ च्या दक्षिण कोपऱ्यापर्यंत जातो. हे म्हणणे खरे आहे की, सदर उत्तर–दक्षिण रस्ता दहा फुट रुंदिचा आहे. मला त्याची लांबी सांगता येणार नाही. गट क्र. २५५/४ हा एकच गट आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २५५/४ मध्ये कुठेही बांध टाकलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी गट क्र. २५५/४ च्या उत्तर–पूर्व कोपऱ्यात घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी गट क्र. २५५/१ च्या पूर्व बाजूपासून ते गट क्र. २५५/२ च्या पूर्व कोपऱ्यावरुन, दक्षिणेकडे अर्धा भागापर्यंत येउन पुढे गट क्र. २५५/७ च्या गटापासून माझा गट क्र. २५५/४ मध्ये जातो. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २५५/४ च्या पूर्व बाजूस बांधाला बांध लागून संजय पगार याची गट क्र. २५५/७ जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २५५/७ च्या पूर्व बाजूने प्रतिवादी क्र. १ अंबादास पगार ची गट क्र. २५५/२ जमीन ही गट क्र. २५५/१ च्या दक्षिण बांधापर्यंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर पूर्व बाजूचा रस्ता आम्ही सर्व भाउ वापरतो.

**०७.** हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात कोणी कोणत्या भागात अतिक्रमण केले आहे याबाबत नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात मोजणीदाराकडून मोजणी करुन दाव्यातील अतिक्रमण काढूण मिळण्याकरीता अर्ज करुन मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे न्यायालयीन आयुक्तांमार्फत मोजणी करुन अहवाल दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयीन आयुक्तांमार्फत झालेल्या

मोजणीत १८ आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण दाखविण्यात आले होते व त्याप्रमाणे या दाव्यात प्रतिवादीकडून १८ आर क्षेत्र मागणी करीता दाव्यात दुरुस्ती केली आहे.

**०८.** हे म्हणणे खरे आहे की, सण १९९६ मधील वाटप कागदोपत्री झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आमच्या गटाची खातेफोड करुन पोटहिस्सा मोजणी भूमी अभिलेख कार्यालयाकडून करुन घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील व चुलत्यांनी आम्हांला उताऱ्याप्रमाणे वाटप करुन दिले होते.

**न्यायालयाची कामकाजाची वेळ झालेली असल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

वा. दा. कबूल केले.

समक्ष

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.08.12 17:36:54 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
चांदवड

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.08.12 17:36:58 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
चांदवड

**दिनांक – १२/०८/२०२६**